**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** शिरपूर तालुका पोलीस स्टेशन

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0287 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**09/10/2026 00:57

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 08/10/2026
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/10/2026
**Time From (वेळेपासून):** 15:46 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:07 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/10/2026 **Time (वेळ):** 00:38 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/10/2026 00:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सांगवी वनपाल कार्यालयाच्या अ॰ा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पद्मावती मधुसुदन कलाल

(b) **Father's Name (वडील चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** नोकरी

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8788986178

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राहुल रामदास बहिरम | | वडील का नाम : रामदास बहिरम | 1. धवळीविहीर पो जेबापुर,साक्री, जि धुळे ,साक्री ,धुळे,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1500/रु. आरा्पी कडुन जप्त करण्यात आली आहे | 1,500.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): -**

1,500.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी पद्मावती मधुसुदन कलाल, वय 44 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देते की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे एक वर्षापासुन कार्यरत आहे. आज रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना पोलीस उप अधीक्षक श्री सचिन साळुंखे यांनी तक्रारदार राकेश भायला पावरा यांनी त्यांच्याकडे सांगवी, ता. शिरपुर येथील लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याची माहिती दुरध्वनीद्वारे कळविल्याचे सांगुन आम्हास सांगवी, ता. शिरपुर येथे जावुन तक्रारदार यांची तक्रार नोंदवुन पुढील कार्यवाही करण्यास आदेशित केले. त्याप्रमाणे आम्ही महानगरपालिका, धुळे येथील दोन शासकिय कर्मचारी आकाश देविदास मोरे व ललीत राजेंद्र ताकटे, लिपीक यांना उपलब्ध करुन घेवुन आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी कार क्रमांक एम.एच.15 केजी 5114 ने रवाना होवुन सांगवी गावाचे बाहेर टाटा कंपनीचे शोरुमजवळ पोहोचलो. तेथे ठरल्याप्रमाणे तक्रारदार यांची भेट झाली. तेव्हा त्यांनी आम्हास पंचांसमक्ष त्यांच्या तक्रारीची तोंडी हकिगत सांगुन त्यांची तक्रार लिहुन दिली ती पुढील प्रमाणे ''मी मौजे वकवाड, ता. शिरपुर, जि. धुळे येथील रहिवासी आहे. मी मौजे बोराडी येथील कन्या हायस्कुल येथे शिक्षक या पदावर कार्यरत असुन सामाजिक कार्यात सक्रिय आहे. माझो वडील श्री भायला गोविंदा पावरा यांना उदरनिर्वाहासाठी वनविभागाकडुन वनखंड भुमापन क्रमांक 743 ही राखीव शेतजमीन मिळाली असुन सदर शेतजमीनीच्या अनुसुची जे फॉर्मवर (वनहक्काचे दस्तए◌ेवज) वनविभागाने माझया वडीलांचे नांव लावले आहे. शासनाकडुन शिरपुर तालुका दुष्काळग्रस्त म्हणुन घोषित झाला असुन आम्हास शासनाकडुन दुष्काळनिधी मिळणेकरीता वनविभागाकडील जे फॉर्मची आवश्यकता आहे.  सदरचा जे फॉर्म मिळणेकरीता मी माझया वडीलांच्या नावे व आमच्या वकवाड गावातील इतर 14 शेतकऱ्यांचे अर्ज घे◌ेवुन दि.06.10.2026 व दि.07.10.2026 रोजी सांगवी वन परिक्षेत्र कार्यालयात गेलो. तेव्हा कार्यालयात हजर असलेले वनरक्षक राहुल बहिरम यांनी माझेकडुन 15 अर्ज जमा करुन घेतले, त्यानंतर मी आज दि.08.10.2026 रोजी सांगवी वनपरिक्षेत्र कार्यालयात जावुन वनरकक्षक राहुल बहिरम यांची भेट घेवुन मी जमा केलेल्या अर्जाबाबत विचारपुस केली असता त्यांनी मला ''तुम्हाला जे फॉर्म पाहिजे असेल तर मला प्रत्येक जे फॉर्मचे 100 रुपयाप्रमाणे 15 शेतकऱ्यांचे 1500 रुपये द्यावे लागतील, त्याशिवाय तुम्हाला जे फॉर्म मिळणार नाही'' असे सांगितले, तेव्हा मी ''आता माझयाकडे पैसे नाहीत, मी सर्व शेतकऱ्यांकडुन जमा करुन तुम्हाला भेटण्यास येतो'' असे सांगितले आहे.

मला वनरक्षक राहुल बहिरम यांच्या मागणी प्रमाणे त्यांना 1500/- रुपये लाच देण्याची अजिबात इच्छा नाही. माझा त्यांचे सोबत कोणताही आर्थिक व्यवहार अथवा वादविवाद नाही.

मी आज दि.08.10.2026 रोजी वनरक्षक राहुल बहिरम यांना भेटण्यास सांगवी वन परिक्षेत्र कार्यालयात जाणार आहे. तेव्हा वनरक्षक राहुल बहिरम यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी ही विनंती आहे.'' सदर तक्रारीमधील मजकुर व तक्रारदार यांनी केलेली तक्रारीची तोंडी हकिगत सारखीच असल्याने सदर तक्रारी अर्जावर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या आहेत.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी करणेकामी तक्रारदार व दोन्ही पंचांना सुचना देवुन तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देवुन त्यांना वनरक्षक राहुल बहिरम यांची भेट घेण्यासाठी सांगवी वनपरिक्षेत्र कार्यालयात पंच नं. 01 आकाश मोरे यांचेसह तक्रारदार यांची दुचाकी क्रमांक एम.एच. 18 बीके 4485 ने रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार व पंच मोरे असे वनरक्षक राहुल बहिरम यांची भेट घेवुन काही वेळाने आमचे जवळ परत आले. तेव्हा आम्ही पंच नं. 01 मोरे यांना तक्रारदार व वनरक्षक राहुल बहिरम यांच्या भेटीची हकिगत विचारली असता, त्यांनी वनरक्षक राहुल बहिरम व तक्रारदार यांचेत सांगवी वनपरिक्षेत्र कार्यालयात भेट झाली. तेव्हा वनरक्षक राहुल बहिरम यांनी तक्रारदार यांच्याशी चर्चा करुन तक्रारदार यांना त्यांनी जमा केलेल्या अर्जावरुन तयार केलेले 15 जेफॉर्म दाखवुन तक्रारदार यांच्याकडे 1500 रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी थोडया

वेळात घेवुन येतो असे सांगितल्याची हकिगत कथन केली. सदर कथन केलेल्या हकिगतीवरुन व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रित झालेले वनरक्षक राहुल बहिरम व तक्रारदार यांचेतील संभाषण ए◌ेकुन वनरक्षक राहुल बहिरम यांनी लाचेची मागणी केल्याची खात्री झाल्याने आम्ही तंत्रज्ञ मन्यार याचेवर सापळा लावण्याचा निर्णय घेतला.
त्यानंतर आम्ही सापळा आयोजित करुन तक्रारदार यांच्याकडुन 500/- रुपये दराच्या 03 नोटा असे 1500/- रुपये सापळाकामी घेवुन सदर नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर तक्रारदार व पंच नं. 01 मोरे यांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन त्यांना तक्रारदार यांच्या दुचाकीने सांगवी वनपरिक्षेत्र कार्यालयात रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही खाजगी वाहनाने जावुन कार्यालयाच्या परिसरात सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी कार्यालयाचे आवारातुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा आम्ही व सापळा पथकाने वनरक्षक राहुल बहिरम यांना ताब्यात घेतले. तेव्हा आमच्या सुचनेवरुन पंच नं. 02 ललीत ताकटे यांनी वनरक्षक राहुल बहिरम यांनी त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशातील 1500/- रुपये लाचेची रक्कम ताब्यात घेतली. तसा ला.प्र.वि. धुळे कार्यालयात येवुन तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा दोन्ही पंचांसमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
अशाप्रकारे लोकसेवक राहुल राजाराम बहिरम, वय 30 वर्षे, वनरक्षक, वनपरिक्षेत्र कार्यालय, सांगवी, ता. शिरपुर, जि. धुळे यांनी तक्रारदार राकेश भायला पावरा यांच्या वडीलांचे व इतर 14 शेतकऱ्यांचे जेफॉर्म (वनहक्क दस्तए◌ेवज) देण्याकरीता तक्रारदार यांचेकडुन 1500/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम सांगवी, ता. शिरपुर येथील वनपरिक्षेत्र कार्यालयाचे आवारात स्वत: स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरुपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Jaipal Manikrao Hire(I (Inspector)) / PCMH91149 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

पोलीस ठाणे अंमलदार
शिरपूर तालुका पो.स्टे. जि.धुळे

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Jaipal Manikrao Hire
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PCMH91149

पोलीस निरीक्षक
शिरपूर तालुका पोलीस ठाणे जि.धुळे

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**